सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका.

सेवा करार पध्दतीने विशेष कार्यकारी अधिकारी स्वच्छता पदाची नियुक्ती करण्याबाबत.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडे अकरा महिने कालावधीसाठी शासन विभाग / निमशासकीय विभाग / महानगरपालिका / स्थानिक स्वराज्य संस्था विभागातील सेवानिवृत्त कर्मचारी यांना सेवा करार पध्दतीने "विशेष कार्यकारी अधिकारी स्वच्छता" या विवक्षित कामाच्या पदासाठी इच्छुक अर्जदारांकडुन दिनांक २९/०८/२०२३ पर्यंत कार्यालयीन वेळेत अर्ज मागवण्यात येत आहेत.

| अ.क्र. | पदांचे नाव | तपशिल |
|---|---|---|
| १. | विशेष कार्यकारी अधिकारी स्वच्छता | पदसंख्या - १. |
| २. | कामाचा तपशिल | अ. मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदवी.<br>ब.शासन मान्य संस्थेकडील स्वच्छता निरिक्षक पदविका उत्तीर्ण.<br>क. मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.<br>ड.सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील किमान ५ वर्षाचा अनुभव असावा. |
| ३. | मानधन | **परिश्रमीक मोबदला - र.रु. २५०००/-** |

अटी -

१. उमेदवारांने अर्जासोबत स्वत:चे अलिकडच्या काळातील फोटोसह अर्ज, अर्हता अनुभव, शासकीय सेवेतुन सेवानिवृत्त झालेल्या आदेशाची प्रत, आधार कार्ड ओळखपत्र, जन्म तारखेचा दाखला इत्यादी कागदपत्रांच्या साक्षांकित प्रतीसह अर्ज **मा.आयुक्त. सांगली मिरज आणि कुपवाड महानगरपालिका यांचे नांवे मुख्य बारनिशी सांगली येथे दिनांक २९/०८/२०२३ रोजी अखेर सादर करण्याचा आहे.** मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

२. प्राप्त अर्जाची छाननी अंती मुलाखतीची तारीख पात्र उमेदवारांना कळविण्यात येईल. उमेदवारांनी अर्जामध्ये सद्याचा राहण्याचा पत्ता व मोबाईल नंबर न चुकता नमुद करावा.

३. सदर सेवा करार पध्दतीने केलेली नियुक्ती हि निव्वळ तात्पुरत्या स्वरूपातील असुन या नियुक्तीचा महानगरपालिका आस्थापने वरील सेवेशी कोणताही संबंध नाही. नियुक्त करण्यात आलेल्या उमेदवारास महानगरपालिकेच्या सेवेत कोणत्याही प्रकारचा हक्क सांगता येणार नाही. अथवा कायदेशिर दाद मागता येणार नाही.

४. निवड होणा-या उमेदवारांना महानगरपालिकेच्या शर्ती अटी नुसार विवित नमुन्यात रुपये.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर बंधपत्र करुन देणे बंधनकारक राहील.

५. सदर जाहिरातीच्या नियुक्त्या,पदसंख्या, शर्ती अटी यामध्ये बदल कमी अधिक मजकुर इ.बदल वा प्रक्रीया रद्द करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांच्याकडे राखुन ठेवणेत आला आहे.

मा.आयुक्तसो यांचे मान्यतेनुसार }

(राहुल रोकडे)
उपायुक्त (मुख्यालय).
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका.

क्र.मनपा / आस्थावि /०१/ १२२४ / २०२३-२४
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका
दिनांक -- २२ /०८/२०२३

Scanned with AnyScanner